वर्ष-०९ | अंक-४८ | मुंबई, मंगळवार १७ ते २३ ऑक्टोबर - २०२३ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION
No.PLG/205/2022-2024

पोलीस बातमी पत्र
POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 मोबाईलवरुन मुलं आक्रमक का होत आहेत?

3 → प्रशासकराज: निवडणुकांची ढकल'चाल'

मुंबई: वेब मालिका पाहून फसवणूकीची युक्ती सूचली; गरब्याच्या बनावट प्रवेशिका बनवून फसवणूक; १२ तासांत आरोपीला अटक ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

# उत्तर प्रदेशातील 33 गुन्ह्यातील मोस्ट वॉन्टेड आरोपी करत होता ओला-उबेर कॅबवर ड्रायव्हिंग; पनवेल पोलीसांकडून अटक



नवी मुंबईः मुंबई आणि मुंबई जवळपासच्या परिसरातील नागरिकांच्या सुरक्षितेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर येण्याची शक्यता आहे. उत्तर प्रदेशातील मोस्ट वॉन्टेड आरोपीच्या पनवेल पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहे. या आरोपीवर तब्बल 33 गुन्ह्यांची नोंद होती. हा आरोपी ओला-उबेर कॅब चालवत होता. पनवेल पोलिसांच्या या कारवाईनंतर पुन्हा एकदा परप्रांतातील गुन्हेगारांचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. दुहेरी हत्या, खुनाचा प्रयत्न करणारे 7 गुन्हे, दरोडा, हाफ मर्डर, मारहाण, लुटमार अशा 33 गंभीर गुन्ह्यांत हा आरोपी फरार होता. उत्तर प्रदेशातील आझमगडमधील आरोपीला पनवेल पोलिसांनी बेड्या घातल्या आहेत. अब्दुक अजिज हा उत्तर प्रदेशातून फरार होता. उत्तर प्रदेशातून पोलीसांनी त्याच्यावर 50 हजाराचे बक्षीस जाहीर केले होते. मोक्कासारखे तीन उत्तर प्रदेश गॅगस्टर ॲक्ट अंतर्गत गुन्हे आरोपी अब्दूल अजिजवर उत्तर प्रदेशमध्ये दाखल आहेत. पनवेल शहर पोलीस आणि युपी एसटीएफ टीमने संयुक्तरित्या कारवाई करत या आरोपीला अटक केली आहे. आपल्या काका बरोबर तो पनवेलमध्ये राहत होता. विशेष म्हणजे मोस्ट वॉटेंड आरोपी असूनही तो ओला-उबेर सारख्या कंपन्यांमध्ये कॅब चालक म्हणून काम करीत होता. आपल्या भावाच्या लायसन्सवर हा आरोपी गाडी चालवत होता. कंपनीकडे रोज सेल्फी फोटो पाठवूनही कंपनीकडून योग्यरित्या पडताळणी केली जात नसल्याचे म्हटले ...पान २ वर...

# ऑनलाईन ॲपद्वारे कोट्यवधींची सट्टेबाजी करणाऱ्या टोळीच्या मास्टरमाइंडला मुंबई विमानतळावरून अटक

**महादेव बुक' नावाच्या ॲपद्वारे सट्टे बाजी करून २००० कोटी रुपयांहून अधिकचे व्यवहार करणाऱ्या टोळीच्या म्होरक्याला मुंबई विमानतळावरून अटक करण्यात आली आहे. या प्रकरणी अनेक बॉलिवूड सेलिब्रिटी ईडीच्या रडारवर आहेत.**



मुंबई : सरकारी योजनांचं आमिष दाखवत बँक खाती उघडून सट्टेबाजीचे २००० कोटी रुपयांहून अधिकचे व्यवहार करणाऱ्या टोळीचा म्होरक्या मृगांक मिश्रा याला मुंबई विमानतळावरून अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी त्याच्याविरुद्ध लुक आऊट नोटीस जारी केली होती. तो दुबईहून भारतात येताच पोलिसांनी त्याला पकडलं. राजस्थानच्या प्रतापगड पोलिसांनी मे २०२३ मध्ये या प्रकरणाचा खुलासा केला होता. 'महादेव बुक' नावाच्या ॲपद्वारे हा सर्व प्रकार चालवला जात होता. यापूर्वी चित्रपट अभिनेता रणबीर कपूर आणि अभिनेत्री सनी लिओन यांना या प्रकरणी ईडीनं समन्स बजावलं होतं. यामध्ये मृगांक मिश्राचाही समावेश होता.

सात दिवसांची पोलीस कोठडी : प्रतापगड पोलिसांनी मे महिन्यात आयपीएल सट्टेबाजीच्या पैशाच्या व्यवहारासाठी लोकांची बँक खाती उघडणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला होता. या प्रकरणी पोलिसांनी यापूर्वीच चार जणांना अटक केलीय. दुबईत बसून हा संपूर्ण व्यवहार चालवणाऱ्या टोळीचा म्होरक्या मृगांक मिश्रा शनिवारी मुंबई विमानतळावर पोहोचला. विमानतळावर त्याची चौकशी केल्यानंतर प्रतापगड पोलिसांना याबाबत माहिती देण्यात आली. त्यानंतर मुंबईत पोहोचलेल्या प्रतापगड पोलिसांच्या पथकानं मृगांक मिश्राला अटक केली. आरोपीला न्यायालयात हजर करून सात दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे.अनेक बॉलिवूड सेलिब्रिटी ईडीच्या रडारवर : आरोपी मृगांक मिश्रा आयपीएल सट्टेबाजीचे पैसे बनावट खात्यांमध्ये हस्तांतरित करायचा. हे पैसे सट्टेबाजी करणारे ग्राहक आणि दलालांना पाठवले जात होते. या व्यवहारांसाठी व्हॉट्सॲपवर ग्रुपही तयार करण्यात आला होता. या ग्रुपचं चॅटिंग पोलिसांनी हस्तगत केलंय. महादेव सट्टेबाजीच्या मनी लॉंड्रिंग प्रकरणात अनेक बॉलिवूड सेलिब्रिटी ईडीच्या रडारवर आहेत. ईडीनं या प्रकरणात रणबीर कपूर आणि कपिल शर्मासारख्या सेलिब्रिटींना समन्स पाठवले होते.

२००० कोटींहून अधिक रुपयांची सट्टेबाजी : 'महादेव बुक' नावाच्या या ॲपवर काही महिन्यांतच देशभरातून १२ लाखांहून ...पान २ वर...

# 'फर्जी' वेब सिरीज पाहून बनवले दांडियाचे बनावट पास, चौघांना अटक



मुंबई, अटक आरोपींची नावे करण अजय शाह (वय २९ वर्षे), दर्शन प्रवीण गोहिल (वय २४ वर्षे), परेश सुरेश नेवरेकर (वय ३५ वर्षे) आणि कविष भालचंद्र पाटील (वय २४ वर्षे) अशी आहेत. याप्रकरणी तक्रारदार निरव मेहता (वय 38) यांनी केलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी भारतीय दंड संविधान कलम 420 आणि 465 अन्वये गुन्हा दाखल केला आहे. (Farji Web Series

वेब सिरीज बघून शोधली गुन्ह्याची युक्तीः महत्त्वाचे म्हणजे आरोपी करण शाह ग्राफिक डिझायनर असून त्याने 'फर्जी' ही वेब सिरीज पाहिल्यानंतर त्याला अशा प्रकारे गुन्हा करण्याची युक्ती सुचली असल्याचे एका पोलीस ...पान २ वर...

# पडघा गोळीबार प्रकरण उघडकीस; कर्ज फेडण्यासाठी पोलिसाकडून चोरीच्या उद्देशाने गोळीबार



ठाणे : भिवंडी येथील पडघा भागात शुक्रवारी गोळीबार झाल्याची घटना उघडीस आली. हा गोळीबार मुंबई पोलीस दलात कार्यरत असलेले पोलीस कॉन्स्टेबल सुरज ढोकरे (३७) याने केल्याचे समोर आले असून त्याला अहमदनगर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. सुरज हा गेल्याकाही वर्षापासून बेटिंग ॲपच्या माध्यमातून पैसे गमावत होता. त्याच्यावर ४० ते ४२ लाख रुपयांचे कर्ज होते. कर्ज फेडण्यासाठी त्याने चोरीचा मार्ग निवडला होता. त्याने यापूर्वी पिस्तुलाचा धाक दाखवून चोऱ्या केल्या आहेत का याचा तपास पोलीस करत आहेत. पडघा येथील मेंदे गावाजवळ दोघांवर पिस्तुलीने आठ गोळ्या झाडण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला होता. या प्रकरणी पडघा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले, मिलिंद शिंदे तसेच पडघा, कसारा आणि स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांनी तपास सुरू केला होता. सीसीटिव्ही आणि तांत्रिक विश्लेषण करून पोलिसांनी तपास केला असता आरोपी बसगाडी मार्गे अहमदनगरच्या दिशेने जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. याबाबत माहिती मिळाल्यानंतर अहमदनगर पोलिसांनी कोल्हार बस स्थानकाजवळ सुरजला ताब्यात घेऊन त्याची चौकशी केली. त्यात तो मुंबई पोलीस दलात कॉन्स्टेबल असल्याचे समोर आले. त्याला ठाणे ग्रामीण पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. सुरज हा गेल्याकाही वर्षापासून बेटिंग ॲपच्या माध्यमातून पैसे गमावत होता. त्याच्यावर विविध बँक आणि पतपेढीचे ४० ते ४२ लाख रुपयांचे कर्ज होते. कर्ज फेडण्यासाठी त्याने चोरीचा मार्ग निवडला होता. त्याने यापूर्वी पिस्तुलाचा धाक दाखवून चोऱ्या केल्या आहेत का याचा तपास पोलीस करत आहेत.

# एकनाथ शिंदेंचा राज ठाकरेंना धक्का; कल्याणमध्ये मनसेला मोठं खिंडार



आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील सर्वच राजकीय पक्ष कामाला लागले आहेत. राजकीय पक्षांकडून प्रत्येक मतदारसंघात संघटना मजबूत करण्याचं काम सुरू आहे. असं असताना कल्याण लोकसभा मतदारसंघात राज ठाकरेंना मोठा धक्का बसला असून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या काही पदाधिकाऱ्यांनी शिंदे गटात प्रवेश केला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुत्र व खासदार श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश पार पडला. मनसेचे डोंबिवली शहराध्यक्ष ओम लोके, महिला विभाग अध्यक्ष शहर शितल लोके आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे कल्याण-डोंबिवली परिसरात न्यायालयीन लढाई लढणारे ॲड. सुहास तेलंग यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी शिंदे गटात प्रवेश केल्याची माहिती श्रीकांत शिंदे यांनी दिली. मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी शिंदे गटात प्रवेश केल्यानंतर खासदार श्रीकांत शिंदे यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले, “एकनाथ शिंदेंच्या ...पान २ वर...

# 12 दिवसांनी तरुणीवर अत्याचार केलेल्या आरोपीला अटक, तर नागपुरातील महिलांसाठी असुरक्षित ठिकाणांच्या संख्येतही वाढ



नागपूर : नागपुरातील (Nagpur) हिंगणा पोलीस स्थानकाअंतर्गत एका महाविद्यालयीन विद्यार्थिनीवर अत्याचार करण्यात आला होता. त्या घटनेला 12 दिवस उलटून गेल्यानंतर आरोपीला अटक करण्यात पोलिसांना यश आलं आहे. अटक करण्यात आलेला आरोपी पीडित तरुणीच्या ओळखीचा नव्हता. तो त्या दिवशी महाविद्यालयाजवळ फिरत होता. त्या दिवशी महाविद्यालय जवळ फिरत असताना त्याने एकट्या विद्यार्थिनीवर हल्ला करत तिला झाडी झुडुपात ओढून नेले होते. सध्या या आरोपीची पोलिसांकडून चौकशी करण्यात येत आहेत. दरम्यान नागपुरातील आणखी एक धक्कादायक बाब समोर आली आहे. नागपुरातील महिलांसाठी असुरक्षित असलेल्या ठिकणांची संख्या वाढली असल्याचं यावेळी सांगण्यात आलं आहे. नागपुरातील एकूण 230 ठिकाणं ही महिलांसाठी असुरक्षित असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

नागपुरातील या प्रकरणाची संवेदनशीलता लक्षात घेऊन सध्या त्याबाबत बोलणं योग्य ठरणार नाही, अशी माहिती नागपूरचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली आहे. दरम्यान या आरोपीवर यापूर्वी चोरीचा एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पण महिलांसदर्भात एकही गुन्हा त्याच्या विरोधात दाखल नसल्याची माहिती पोलीस आयुक्तांनी दिली आहे.

महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर? दरम्यान महाविद्यालयीन विद्यार्थिनीसोबत घडलेल्या या घटनेनंतर नागपूर पोलिसांनी नागपुरातील महिलांच्या सुरक्षेचा अनुषंगाने महिलांसाठी धोकादायक ठिकाणांची यादी जाहीर केली आहे. त्याप्रमामे नागपुरातील 230 ठिकाणं महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने धोकादायक असल्याचं समोर आलं आहे. यापूर्वी नागपुरात महिलांसाठी असुरक्षित अशी 178 ठिकाणं होती. त्यामुळे आधीच्या तुलनेत नागपुरात आधीच्या तुलनेत महिलांसाठी कमी सुरक्षित शहर झालं आहे का असा प्रश्न निर्माण केला जात आहे. तर या सर्व ठिकाणांवर नियमितपणे प्रवास करणाऱ्या महिला आणि तरुणींना जागृत ...पान २ वर...

# ड्रग्ज रॅकेटचा वापर झाला अन्‌ललित पाटील नेपाळमार्गे परदेशात पळाला? दोन आठवड्यानंतरही थांगपत्ता नाही




पुणेः ड्रग माफिया ललित पाटीलला (Lalit Patil) पुण्यातील ससून रुग्णालयातून (Sasoon Hospital Drug Racket) पसार होऊन आज दोन आठवडे झाले. पण पुणे पोलिसांनी जंग जंग पछाडूनही ललित पाटील हाती लागलेला नाही. आपल्या ड्रग रॅकेटचा उपयोग करून ललित पाटील परदेशात पळून गेल्याची शक्यता व्यक्त होतेय. कारण या आधी त्यानं मलेशिया, थायलंड आणि दुबईमध्ये मेफेड्रोन एस्कपोर्ट केल्याचं समोर आलं आहे . ललित पाटील 2 ऑक्टोबरला ससूनमधून अगदी निवांतपणे बाहेर पडला. नेहमीप्रमाणे जवळच असलेल्या पंचतारांकित हॉटेलमध्ये जाऊन तो पुन्हा ससूनमधील कैद्यांसाठी असलेल्या कोठडीत परत येईल असं बंदोबस्तावर असलेल्या पोलिसांना वाटलं होतं. पण ससूनमधून अलगदपणे निसटणाऱ्या ललित पाटीलने सुसाट वेगानं नेपाळ बॉर्डर गाठली. त्याच्या मागावर असलेले पुणे पोलीस त्याचा भाऊ भूषण पाटील आणि अभिषेक बालकावडेला तर पकडू शकले, पण मास्टरमाइंड ललित मात्र पोलिसांच्या ताब्यातून निसटला तो निसटलाच. शेळ्या एक्सपोर्ट करण्याचा व्यवसायललित पाटील होता तर ड्रग माफिया, पण कोणाला संशय येऊ नये म्हणून देश - विदेशात शेळ्या एक्स्पोर्ट करणाऱ्या व्यवसायिकाचा मुखवटा त्यानं परिधान केला होता. भाऊ भूषण पाटीलसह त्यानं दुबईला शेळ्या पाठ्वल्याच ...पान २ वर...

# बनावट लग्न लावणारं रॅकेट, तरुणाकडून 3 लाख उकळले; आरोपी महिला एका मुलीची आई



बीड : मागील काही वर्षात राज्यात अनेक ठिकाणी बनावट लग्न लावून फसवणूक केल्याच्या घटना सतत घडत असल्याचे समोर आले आहे. अनकेदा गुन्हा दाखल झाल्यावर देखील या घटना काही थांबता थांबत नसल्याचे चित्र आहे. दरम्यान, आता बीड जिल्ह्यात सुद्धा अशीच घटना समोर आली असून, बनावट लग्न लावून तरुणाची 3 लाखांची फसवणूक करण्यात आली आहे. त्यामुळे बनावट लग्न लावणारं रॅकेट सक्रीय असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. तर या प्रकरणी दोन एजंटसह महिलेच्या विरोधात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे लग्न लावून फसवणूक करणारी महिला आरोपी एका मुलीची आई आहे.

बीडमध्ये बनावट लग्न लावणर एक मोठे रॅकेट सक्रिय झाला असल्याचे समोर आले आहे. कर्नाटक येथील एका मुलीची आई असलेल्या महिलेने बीडच्या एका तरुणाशी लग्न करून तीन लाख रुपये ...पान २ वर...


पोलीस बातमी पत्र

मुंबई

मंगळवार १७ ते २३ ऑक्टोबर - २०२३



# मोबाईलवरुन मुलं आक्रमक का होत आहेत?



केरळमधल्या कन्नूर जिल्ह्यातील केणिच्चिरा या गावातील घटना. मोबाईलचे व्यसन लागलेल्या मुलाला मोबाईलच्या अतिवापराबद्दल आईने टोकले असता मुलाने आईवरच प्राणघातक हल्ला केला. घरातल्या भिंतीवर तिचे डोके जोराने आपटले. हा हल्ला इतका जबरदस्त होता की त्यात आई मृत्युमुखी पडली. आईवर आठवडाभर रुग्णालयात उपचार झाले पण झालेल्या जबर दुखापतीतून ती वाचू शकली नाही. ही क्वचित घडणारी घटना वाटू शकते, अपवादात्मक. पण खरंतर शारीरिक हल्ला नसला तरी मोबाईलवरुन शाब्दिक हल्ले आणि थोडेबहुत प्रमाणात आई वडिलांशी मारामारी हे प्रकार आजूबाजूला घडू लागले आहेत. वाढताना दिसतायेत. इथे शारीरिक मारामारी दोन्ही बाजूने सुरु आहे. मोबाईल वापरू नकोस म्हणून मुलांना चारवेळा सांगितलं आणि तरीही मुलांनी ऐकलं नाही तर पालक त्यांच्यावर सर्रास हात उगारतात, पॉर्न क्लिप्स बघताना दिसले की मारहाण करण्याचं प्रमाण आहेच. आता उलट वारही व्हायला सुरुवात झालेली आहे. आईबाबांनी मोबाईल बाजूला ठेव असं नुसतं म्हटलं तरी मुलं कावतात, चिडतात, धुसफूस करायला लागतात. संतापतात. हे अगदी घरोघरी बघायला मिळतंय. याचंच पुढचं पाऊल म्हणजे मारहाण. प्रत्येक घरात मारहाण होत नसली यावरुन तरी पालक आणि मुलं यांच्यातल्या विसंवादाचं; खरंतर भांडणाचं कारण मोबाईल होऊ बघतो आहे आणि हे अतिशय गंभीर आहे. यात पालक चुकतात की मुलं चुकतात असा विचार करण्यापेक्षा पालक आणि मुलं यांचं मिळून जे कुटुंब बनलेलं आहे त्यात प्रचंड विसंवाद आहेत. विसंवादाचे मुद्दे अनेक आहेत, अगदी खाण्यापिण्याच्या सवयींपासून, कपडे कसे घालायचे, डेटिंग करायचं का, कधी करायचं, काय बघायचं, काय ऐकायचं, लैंगिक अग्रक्रम.. अगणित मुद्दे आहेत. ज्यामध्ये पालक आणि मुलं यांचा 'कॉमन ग्राऊंड' नाहीये. म्हणजे पालक आणि मुलं यांच्यात समान गोष्टी फार कमी उरलेल्या आहेत. या आधीच्या पिढयांमध्ये घरात सगळ्यांच्यात मिळून एकच टीव्ही किंवा रेडिओ होता. त्यामुळे एकमेकांच्या सीरिअल्स आवडो न आवडो माणसं एकत्र बसून बघत होती. सिनेमे, नाटकं, पुस्तकं, गाणी या सगळ्या मध्ये पालक आणि मुलं यांच्या जगात प्रचंड मोठी दरी नव्हती. एकमेकांच्या जगात काय सुरु आहे याचा पत्ताच नाही अशी परिस्थिती नव्हती. पण मोबाईल आणि त्यात इंटरनेट आल्यावर एक प्रकारचं एकलकोंडेपण ही माध्यमं घेऊन आली आहेत. मनोरंजनापासून रेसिपीपर्यंत आणि डेटिंगपासून अध्यात्मापर्यंत सगळ्या गोष्टी ज्याच्या त्याच्या मोबाईलच्या ब्लॅक स्क्रीनमध्ये घडायला सुरुवात झाली आहे. त्यामुळे घरात चार काय सहा (आजीआजोबा) माणसं असतील तरीही त्यांच्यात समान धागा अनेकदा नसतो. तो असायला पाहिजे, त्यासाठी विशेष मेहनत घेतली पाहिजे हा कसलाच विचार नाहीये. मुलं केपॉप ऐकतात, गेमिंग करतात म्हणून आरडा ओरडा करणाऱ्या पालकांनी कधी केपॉप गाणी ऐकून बघण्याचा प्रयत्न केलाय का? ती आपल्याला आवडायला पाहिजेत असं मुळीच नाहीयेत पण तुझ्या जगाची मला ओळख करुन दे हा संदेश त्यातून आपोआप मुलांपर्यंत पोहोचतो आणि मग तेही पालकांच्या जगात डोकावायला तयार होतात. 'कॉमन ग्राऊंड' समान जमीन अशीच तयार होत असते. पण पालकही मुलांइतकेच मोबाईलमध्ये अडकलेले आहेत. त्यांनाही त्यांच्या व्हॉट्सअप गप्पा सोडवत नाहीत, त्यांच्या सीरिअल्सचे एपिसोड बाजूला ठेवून पोरं काय म्हणू बघता आहेत हे ऐकायला फुरसत सापडत नाही. शिवाय सतत हातात फोन हवा ही सवयही पालकांकडूनच बऱ्याचदा मुलांपर्यंत पोहोचलेली असते. लहानपणी जेवावं म्हणून डोळ्यासमोर ठेवलेला मोबाईल कधी त्या मुलांच्या आयुष्याचा अविभाज्य घटक बनतो ते ना पालकांच्या लक्षात येतं ना मुलांच्या. गोष्टी हाताबाहेर जायला लागल्या की अनेकदा पालक जागे होतात पण तोवर फार उशीर झालेला असतो. अनेकदा मुलं मोबाईलच्या अवलंबत्वाकडून व्यसनाकडे वळलेली असतात. कुठलंही व्यसन करणाऱ्या माणसाला तू व्यसन करु नकोस म्हटलं की तो आक्रमक होतो.

---

## वसई विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती "ॲ" बोळींज विरार

जा.क्र : व.वि.श.म/बोळींज /१२७७/२०२३-२४ दिनांक ११.१०.२०२३

### जाहीर नोटीस

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अधिसुचीत तीन प्रकरण ८(१) व १(२) अन्वये जाहीर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालय विरार येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत हितसंबंधकाने हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालय बोळींज येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका मध्ये याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ.क्र | दिनांक | अनुसुचित दोन/तीन मधील नोटीसीचा मालमत्ता क्र. | करनिर्धार पुस्तकातील वार्ड क्र. | मालमत्तेचे ठिकाण | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणा-याचे नाव किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव | खरेदीखताचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ०३-१०-२०२३ V | R१७/५८५/१४ | १७ | रुस्तमजी एव्हरशाईन वेन्चर ऐव्हन्यु जे ग्लोबलसिटी, बिं.नं. ११ रुम नं.२०३ | धनराज एच प्रजापती | सुनिता राहुल नादोला व तेजस आर नादोल |
| २ | ०४-१०-२०२३ V | R१४/१५ | १४ | गोविंद तळ मजला, चोरघे आळी डोंगरपाडा | वासंती हरिश्चंद्र चोरघे | मनोज हरिश्चंद्र चोरघे व चेतन हरिश्चंद्र चोरघे (वारसाने) |
| ३ | ०५-१०-२०२३ V | R१५/५६५/२०७ | १५ | ४०४, रेसिडेन्सी पार्क, सी/६ रुम नं. ४०४ नारिंगी रोड | एच डी आय एल | दिपककुमार फकिरा पवार |
| ४ | ०५-१०-२०२३ V | R११/१६३/५७ | ११ | पुरुषोत्तम पारेख मार्ग, श्री. हरि को ऑप हौ.सो, सी विंग | मोहीद्दीन अब्दुल कदार | सुमित राजेश भारद्वाज व राजेश ज. भारद्वाज |
| ५ | ०५-१०-२०२३ V | R२४/६०/१० | २४ | ज्योती हमिटेग अपार्ट, रूम नं. ३०१, चाणक्य चौक | मंदा मलैया | अक्षय चंद्रकांत पुजारे व अजित चंद्रकांत पुजारे |
| ६ | ०५-१०-२०२३ V | R२४/७२/१८ | २४ | भाविन नं.३, को हौ सो बी/१०७ विराट नगर | ऑलव्हीन रॉड्रीक्स व आलिशा रॉड्रीक्स | शांता कानुभाई पटेल व कानुभाई हिराभाई पटेल |
| ७ | ०५-१०-२०२३ V | R२९/१५७/८ | २९ | हिराविद्यालय १ ला मजला ए/१०१ ओमकार विहार को ऑ हौ सो | निलेश अशोक ढापरे | मंगेश भिसाजी मुळीक व विनिता मंगेश मुळीक |
| ८ | ०५-१०-२०२३ V | R११/२१/३६ | ११ | वृषभ अपार्टमेंट शॉप नं.४, विरार पं. | ललित गोविंद भाटी व शिल्पा ललित भाटी | जयंती मोहन मारू |
| ९ | ०५-१०-२०२३ V | R१५/५९५/१३ | १५ | आई जिवदानी अपार्ट, रूमं.नं.ए/२०१, हिरा विद्यालय रोड, डोंगरपाडा | रागिणी वर्मा | अमिषा रवीकांत पटेल व रवीकांत प्रविण पटेल |
| १० | ०५-१०-२०२३ V | R२४/३९/१८ | २४ | विराट नगर २०१ सिध्दी विनायक को हौ सो | दिलीप नारायण खोत | किशोर हरिश्चंद्र विचारे |
| ११ | ०५-१०-२०२३ V | R१५/५७१/२८ | १५ | डोंगरपाडा साई सागर कॉम्पलेक्स बिं.नं.२, देशमुख नगर जिल्हा परिषद शाळा | प्रकाश सिताराम शेगर | देवेंद्र रमेश दाभोळकर व रमेश केशव दाभोळकर |
| १२ | ०५-१०-२०२३ V | R११/११३/१३ | ११ | ए/३०३ तिसरा मजला न्यु परिजात सो, विराट नगर विरार पं. | हमीर जाद्वभाई भेडा | विनिता राजेश भारद्वाज व राजेश ज. भारद्वाज |
| १३ | ०५-१०-२०२३ V | R२४/९१/४ | २४ | ए-९, १ ला मजला मयेकर वाडी त्रिलोक अस्मिता को हौ सो | विवेक आत्माराम केळुस्कर | दिक्षा दिपक ठोंबरे व दिपक शांताराम ठोंबरे |
| १४ | ०५-१०-२०२३ V | R१७/५१८/३६७ | १७ | रूम नं.१०२, ग्लोबलसिटी, रुस्तमजी एव्हरसाईन जॉईट वेंन्चर एव्हेन्यु जे नारंगी | फारेडुन सॅम इरानी | सुधा सुरेंद्र प्रसाद |
| १५ | ०५-१०-२०२३ V | R१७/५०६/१७ | १७ | रूस्ममजी एव्हरशाईन जॉईंट वेंन्चर, एस/०१, बिं.नं.६२, रूम नं.४०३ | लीना निखिला परूळकर | गितेश गणपत नार्वेकर व दिव्या गोविंद सिंग |
| १६ | ०५-१०-२०२३ V | R१७/५०६/८४ | १७ | एव्हेन्यु जे.४५ रूस्तमजी एव्हरशाईन टी/०५, बिं.नं.४५, रूम नं. ६०२ | पंकज कुमार वर्मा | ललन कुमार व पूजा शाह |
| १७ | ०५-१०-२०२३ V | R१७/६१८/१९ | १७ | ग्लोबलसिटी, चिखलडोंगरी एव्हेन्यु आय-३, रून मं. १२०१ | अर्जुन राजु पुरोहित व ममता अर्जुन पुरोहित | जितेश वर्मा |
| १८ | ०९-१०-२०२३ V | R२४/१००/१ | २४ | सुहास अपार्ट, रूम नं.३०२, विराट नगर | रविंद्र पी पोतदार | धर्मदेव सदाकांत चौधरी |
| १९ | ०५-१०-२०२३ V | R१७/६२५/३ | १७ | कासा विस्टा बि.नं.८ एव्हेन्यु ए/२, रूम नं.०३, ग्लोबलसिटी | संहिता महेंद्र तारकर | अफसाना सिझामुदिन मलिक |
| २० | ०५-१०-२०२३ V | R१७/६६/५० | १७ | रूम नं. ६०४, सुमित ग्रीनडल, ग्लोबलसिटी, चिखलडोंगरी रोड | संजय वी भाडेकर | प्रकाश सिताराम जाधव व प्रतिभा प्र. जाधव व प्रीतम प्र. जाधव |

सही/-

शशिकांत पाटील)

प्र. सहा. आयुक्त

प्रभाग समिती "ॲ" बोळींज

वसई विरार शहर महानगरपालिका

---

## 'फर्जी' वेब सिरीज पाहून बनवले दांडियाचे

अधिकाऱ्याने सांगितले. दुर्गादेवी नवरात्र उत्सव समिती बोरीवली आणि आमदार सुनील राणे यांनी 14 ऑक्टोबरला रात्री साडेअकरा वाजताच्या सुमारास 'रंगरात्री दांडिया विथ किंजल दवे' या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. आरोपींनी आयोजकांची आर्थिक फसवणूक करण्याच्या उद्देशाने बनावट पासेस तयार केले. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्यात चार आरोपींचे निष्पन्नः गुन्हा नोंद होताच एमएचबी कॉलनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुधीर कुडाळकर यांनी तत्काळ पोलीस उपनिरीक्षक डॉ. दीपक हिंडे यांच्या सोबत पथक नेमून गुन्हा उघडकीस करण्याबाबत सूचना दिल्या. तपास करत असताना साक्षीदार यांचे जबाब नोंद केले असता त्यात करण अजय शाह, दर्शन प्रवीण गोहिल, परेश सुरेश नेवरेकर, कविष भालचंद्र पाटील यांचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. या गुन्ह्याच्या अनुषंगाने वॉटेड आरोपी त्याच्या राहत्या घरी विरार, कांदिवली पूर्व या परिसरात मोबाईल लोकेशनवरून त्याचा शोध घेतला गेला. तसेच 20 ते 25 साक्षीदारांची पडताळणी केली असता ते पोलिसांच्या जाळ्यात अडकले.

35 लाखांचा मुद्देमाल जप्तः एका आरोपीकडे चौकशी केली असता त्याचा या गुन्ह्यात सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास अटक करण्यात आली. अटक आरोपींकडून तीस लाख रुपयांचे बनावट पासेस आणि दहा हजार रुपयांचे 1000 होलोग्राम स्टिकर, लॅपटॉप, प्रिंटर आणि इतर साधन सामग्री ज्याची किंमत पाच लाख रुपये अशी एकूण 35 लाख दहा हजार रुपयांची मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे.

## ड्रग्ज रॅके टचा वापर झाला

रेकॉर्ड उपलब्ध आहे. पण शेळयांच्या नावाखाली त्यानं मेफेड्रोन दुबईला पाठवल्याच पोलीस सूत्रांच म्हणणं आहे. त्याचबरोबर मलेशिया, थायलंड या इतर देशांमध्ये देखील ललित पाटीलने मेफेड्रोन पाठवलं होत आणि त्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय स्तरावर त्याच नेटवर्क तयार झालं. याच नेटवर्कचा उपयोग करून ललित पाटील भारताबाहेर पळाल्याची शक्यता आहे . पुणे पोलिसानी ललिताचा भाऊ भूषण आणि साथीदार अभिषेक बलकवडे यांच्याकडे पाच दिवस चौकशी केल्यानंतर ते तपासात सहकार्य करत नसल्याचं सोमवारी न्यायालयात सांगितलं. त्यांच्याकडून पोलिसांनी पेन ड्राइव्ह आणि इतर साहित्य जप्त केलेलं. नाशिक एम आय डी सी मधील मेफेड्रोन तयार करणाऱ्या कारखान्याची पोलिसांनी तपासणी केली. दोघांच्या घरी जाऊन घरच्यांकडेही चौकशी करून झाली. पण ललिताचा थांगपत्ता लागत नाही. ललित पाटील पळून गेला की त्याला पळवलं ?ललित पाटील पळाला की त्याला पळवून लावलं हा प्रश्न तर पहिल्या दिवसापासून विचारला जातोय. कारण तो पकडला गेला तर एक नाही तर अनेकांचा बिंग फुटणार आहे . पुणे पोलीस दलातील नऊ कर्मचाऱ्यांना या आधीच या प्रकरणात निलंबित करण्यात आलयं तर ससूनच्या व्यवस्थापनाची चौकशी करणाऱ्या चार सदस्यीय चौकशी समितीने ललितवर उपचार करणाऱ्या सहा डॉक्तरांचे जबाब नोंद केलेत. पण राजकीय विरोधकांनी जे आरोप केलेत त्या आरोपांना गृहमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीसांनी अजून उत्तर दिलेलं नाही. रात्र आणि दिवस प्रयत्न करून देखील पुणे पोलिसांची दहा पथकं ललित पाटीलला शोधू शकलेली नाहीत. त्यामुळं पुणे पोलीस दलावर प्रचंड दबाव आहे. ललित पाटील या आधी देखील अनेकदा ससूनमधून बाहेर येऊन पुण्यात वेगवेगळ्या ठिकाणी त्याच्या साथीदारांना भेटत असल्याचं समोर आलंय. पुण्यातील सोमवार पेठेत तो त्याचा साथीदार अभिषेक बलकवडे सोबत फिरताना सीसीटीव्ही मध्ये दिसतोय. तो जिथे जिथे गेला होता त्या सगळ्यांची पोलीस चौकशी करत आहेत. या प्रकरणात लवकरच आणखी काही जणांना अटक करण्यात येईल अशी शक्यता आहे. मात्र जोपर्यंत स्वतः ललित पाटील सापडत नाही तोपर्यंत ललित पाटीलला नक्की कोण वाचवत होतं हे रहस्य कायम राहणार आहे. स्थानिक पातळीवर पोलीस आणि डॉक्टरांचं घट्ट जाळं ललित पाटीलने स्वतःच्या बचावासाठी विणलं होतं. तसंच आंतरराष्ट्रीय पातळीवर चालणाऱ्या मोठ्या ड्रग सिंडिकेटचा तो भाग होता. त्यातूनच मलेशिया आणि थायलंड सारख्या देशांमध्ये त्यानं मेफेड्रोन पाठ्वल्याच समोर आलं आहे. हे ड्रग सिंडिकेट तर त्याला वाचवण्याचा प्रयत्न करतच आहे शिवाय तो कधी सापडूच नये अशी भारतातील अनेकांची इच्छा आहे. सामान्यांना मात्र ललित पाटीलला पाठीशी घालणारे नक्की कोण आहेत हे समोर येईल अशी भाबडी आशा आहे. आता पपुणे पोलीस कोणाच्या विश्वसाला पात्र ठरतात हे पाहायचं आहे.

## बनावट लग्न लावणारं रॅकेट

उकळल्याप्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बीड शहरातील धांडेनगर भागात राहणाऱ्या एका तरुणाचं लग्न होत नव्हते. त्यामुळे त्याने बीड मधीलच लग्न जमवणारे रामभाऊ कुलकर्णी यांच्याशी संपर्क साधला. कुलकर्णी यांनी कर्नाटक येथील बिदरच्या सुनिता नावाच्या महिलेशी तरुणाची भेट घालून दिली. त्यानंतर दिव्या नावाच्या मुली सोबत या तरुणाचं लग्न लावण्यात आलं होतं. तरुणाला संशय आला अन्... मात्र, लग्न लावण्यापूर्वी सुनीता हिने दिव्याच्या कुटुंबीयांना तीन लाख रुपये द्यावे लागतील अशी अट घातली होती. त्यानंतर या तरुणाने दोन लाख 80 हजार रुपये कुलकर्णी यांच्याकडे दिले होते. विवाहाच्या एक महिन्यानंतर उर्वरित रक्कम देण्यात आली. मात्र, लग्नाला एक महिना होताच दिव्या हिने परत बिदरला जाण्याचा आग्रह धरला. त्यामुळे तरुणाला संशय आला आणि हे सर्व एक रॅकेट असल्याचे त्याननंतर स्पष्ट झाले. या महिलेचे यापूर्वी देखील दोन लग्न झालेले असून, एका पतीपासून तिला मुलगी देखील असल्याचं पोलीस तपासात उघड झाले आहे. त्यामुळे या प्रकरणी दोन एजंटसह या महिलेच्या विरोधात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशी केली जाते फसवणूक? मागील काही वर्षात बनावट लग्न लावून फसवणूक करण्याचे प्रमाण वाढले आहेत. राज्यातील अनेक भागात अशा घटना उघडकीस आल्या आहेत. ज्यात बनावट लग्न लावणरं एक मोठे रॅकेट सक्रिय असून, संपूर्ण टोळी मिळून अशी फसवणूक करतात. अनेकदा यात मुलीचे आई-वडील देखील बोगस दाखवून लग्न लावण्यात येते. त्यानंतर बनावट नवरी घरातील पैसे आणि दागिने घेऊन पसार होते. विशेष म्हणजे अनेकदा लग्न लावण्यासाठी मुलीच्या आई-वडीलांना काही पैसे द्यावे लागतील असे सांगून मुलाच्या कुटुंबीयांकडून पैसे देखील वसूल करण्यात येते. तर, बीड जिल्ह्यात यापूर्वी देखील असे प्रकार समोर आले आहेत.

## ऑनलाईन ॲपद्वारे कोट्यवधींची

अधिक लोक जोडले गेले होते. क्रिकेटपासून निवडणुकीपर्यंत सगळ्यावर सट्टेबाजी करण्यासाठी लोकांनी या ॲपचा वापर केला. कोरोना महामारीनंतर या ॲपचा व्यवसाय वेगानं वाढला. २०२१ मध्ये कोरोनामुळे आयपीएल स्पर्धा प्रेक्षकांविना आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी महादेव ॲपच्या माध्यमातून २००० कोटींहून अधिक रुपयांची सट्टेबाजी करण्यात आली होती. या टोळीनं देशभरात ६८ बनावट खात्यांद्वारे व्यवहार केले होते. आतापर्यंत पोलिसांनी या खात्यांमधील सुमारे ४ कोटी रुपये जप्त केले आहेत.

## एकनाथ शिंदें चा राज ठाकरें ना धका;

प्रेमापोटी आणि ते ज्याप्रकारे संपूर्ण महाराष्ट्रात काम करतायत, ते पाहून दरदिवशी मोठ्या संख्येनं नगरसेवक, पदाधिकारी एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश करत आहेत. आमचे नेते आणि मुख्यमंत्री दिवसातील १६-१६ तास काम करत आहेत. जनतेसाठी झटत आहेत, हे लोकांना दिसत आहे. त्यामुळे मोठ्या संख्येनं लोक आमच्या पक्षात प्रवेश करत आहेत." "आज नांदीवलीमधून ओम लोके, सुहास तेलंग यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी पक्षप्रवेश केला. कल्याण लोकसभेत ज्याप्रकारे कामं सुरू आहेत. या कामांना प्रभावित होऊन आणि येथे आमचे कार्यकर्ते व पदाधिकारी ज्याप्रकारे काम करतात, त्यांनी जशी संधी मिळते, ते पाहून मनसेचे पदाधिकारी आमच्याकडे आले," असंही श्रीकांत शिंदे म्हणाले. "राज्यात विकासाची घोडदौड पाहून सगळे लोक आमच्या पक्षात प्रवेश करत आहेत. येत्या काळात वेगवेगळ्या पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते एकनाथ शिंदेंच्या नेतृत्त्वाखालील शिवसेनेत प्रवेश करतील," असा विश्वासही खासदार शिंदे यांनी व्यक्त केला.

## 12 दिवसांनी तरुणीवर अत्याचार के लेल्या

करण्यासाठी विशेष मोहीम राबवण्यात येणार असल्याचं नागपूर पोलिसांनी सांगितलं आहे. त्यामुळे नागपुरातील महिलांच्या सुरक्षेच्या बाबतीत पोलीस प्रशासन देखील आता सुसज्ज झालं असल्याचं पाहायला मिळत आहे.

त्या तरुणीसोबत नेमकं काय घडलं? नागपुरातील वर्धा रोडवर निर्जन रस्त्यावर एका महाविद्यालयीन विद्यार्थिनीवर अत्याचार झाल्याची घटना घडली. मुख्य रस्त्यावरुन झाडी झुडूपांच्या निर्जन रस्त्यावरून महाविद्यालयकडे जात असताना अज्ञात आरोपीनं कुऱ्हाडीचा धाक दाखवत पीडित विद्यार्थिनीला झाडी झुडुपात ओढून नेत तिच्यावर अत्याचार केला. 5 ऑक्टोबर रोजी दुपारी 11 ते 1 च्या दरम्यान ही घटना घडली, दरम्यान त्यानंतर 12 दिवसांनी म्हणजेच 16 ऑक्टोबर रोजी या संदर्भातील आरोपीला अटक करण्यात आली आहे.

## उत्तर प्रदेशातील 33 गुन्ह्यातील

जात आहे. त्यामुळेच वॉटेड आरोपी या ॲप बेस्ड कंपनीमध्ये चालक म्हणून काम करत होता, असे म्हटले जात आहे. पनवेल पोलिसांमुळे उघड झालेल्या या प्रकारामुळे या ॲप बेस्ड गाड्यांमधून प्रवास करणे धोकादायक असल्याचे दिसून येत आहे.

पोलिसांच्या तावडीतून फरार झाल्यानंतरही 3 ठिकाणी केली चोरी, सराईत बॅग चोराला अखेर बेड्या

पोलिसांच्या तावडीतून पळालेला कुख्यात चोर मंगेश पार्टे याला अखेर आठ दिवसांनी पकडण्यात विरार पोलिसांच्या गुन्हे शाखा 3 च्या पथकाला (Virar Police) यश आले आहे. विशेष म्हणजे फरार असतानाही या आरोपीने 3 ठिकाणी चोरी केली होती. त्याला यापूर्वी सख्या भावाच्या हत्या प्रकरणातही अटक करण्यात आली होती.

## संपादकीय...



# पहिली परीक्षा

विधानसभांचा लोकसभेच्या निवडणुकांशी संबंधच नसेल तर, लोकसभा निवडणुकीत यशाची हमी असल्याचे मानणाऱ्यांनी विधानसभांसाठी रक्ताचे पाणी करायची गरजच काय? निवडणूक आयोगाने पाच राज्यांतील निवडणुका एकदाच्या जाहीर केल्या हे बरे झाले म्हणायचे. त्यामुळे निदान निवडणूक आचारसंहिता तरी लागू होईल आणि या निवडणूक घोषणेच्या अभावी जी आचरट बडबड सुरू होती ती बंद होईल. या निवडणुकेच्छुक राज्यांत गेले काही महिने ज्या काही घोषणांचा पाऊस पडत होता, जी काही स्वप्ने दाखवली होती आणि ती अमलात कशी येणार नाहीत हे प्रतिस्पर्धी सांगत होते, राष्ट्रद्रोही आणि राष्ट्रभक्तीचे जे काही दावे केले जात होते ते आता थांबतील. आता जो काही असेल तो प्रचार असेल आणि तो आचारसंहितेस अनुसरून करावा लागेल. अशा तऱ्हेने मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, तेलंगणा आणि मिझोरम ही पाच राज्ये पुढील महिन्यापासून आपले स्थानिक लोकप्रतिनिधी निवडू लागतील. नवरात्र आणि त्यानंतर येणारी दिवाळी या राज्यांत आचारसंहितेच्या अमलाखाली असेल. म्हणजे या राज्यांतील दीपावलीत आश्वासनांचे भुईनळे आणि आरोप-प्रत्यारोपांचे आपटबार तत्त्वतः निवडणूक आयोगाच्या देखरेखीखाली फोडावे लागतील. आचारसंहिता असताना हे कसे करायचे याचे आवश्यक ज्ञान आपल्या सर्व पक्षांस आहेच. त्यामुळे दीपावलीचा आनंद या राज्यांत प्रसंगी 'द्विगुणित' कसा होईल असाच प्रयत्न या राजकीय पक्षांचा असेल, यात शंका नाही. त्यानंतर डिसेंबराच्या पहिल्या आठवड्यात या सगळ्यांचा एकत्रित निकाल लागेल आणि कोणत्या राज्यात कोणास सत्ता मिळाली वा कोणी कोठे गमावली हे स्पष्ट होईल. म्हणजे नवे वर्ष उजाडेल ते या राज्यांतील राजकीय निकालांच्या प्रकाशात. या प्रकाशात मग पुढील वर्षांतील सार्वत्रिक निवडणूक लढवली जाईल. म्हणून या पाच राज्यांतील निवडणुकांचे महत्त्व.

त्यातही मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थान ही उत्तरेतील राज्ये अधिक महत्त्वाची आणि त्याखालोखाल दक्षिणेतील तेलंगण. ईशान्येकडील मणिपुरातील हिंसाचाराचा आगडोंब अद्यापही शमलेला नाही. त्यामुळे शेजारील मिझोरमात त्याचा काय परिणाम होईल याचा अंदाज या निवडणुकांतून येईल. यातील दोन राज्यांत- मध्य प्रदेश आणि मिझोरम- भाजप सत्तेवर आहे तर राजस्थान आणि छत्तीसगडात काँग्रेस. या दोन्ही पक्षांपासून समअंतरावर असल्याचे सांगत राष्ट्रीय दावा करीत शुद्ध स्थानिक पक्ष तेलंगण चालवतो. मध्य प्रदेशात भाजपनेच अधांतरी ठेवलेले शिवराजसिंह चौहान यांना सत्ता राखता येणार का आणि राजस्थान, छत्तीसगडातील अनुक्रमे अशोक गेहलोत आणि भूपेश बघेल हे काँग्रेस श्रेष्ठींना निवडणुकांनंतरही अधांतरी ठेवू शकणार का याचे उत्तर या निवडणुकांत मिळेल. यातील मध्य प्रदेशात गेल्या निवडणुकीत वास्तविक काँग्रेसने कसाबसा का असेना पण विजय मिळवलेला होता. परंतु पक्षांतर्गत मतभेद आणि इतक्या वर्षांचा सत्तामद यामुळे त्या पक्षास काय चालले आहे याचा अंदाज आला नाही. हाती आलेली सत्ता त्या पक्षाने भाजपस अर्पण केली. त्यामुळे मुख्यमंत्रीपदावर मामा शिवराज यांची पुन्हा वर्णी लागली. सुरुवातीस हे शिवराज मामा दिल्ली सत्तास्पर्धेतील एक खेळाडू मानले जात. त्याचीच शिक्षा त्यांना मिळाली आणि त्यांच्या फांद्या छाटल्या गेल्या. त्यांची उमेदवारीच जाहीर न करण्याची पक्षाची कृती ही त्याचीच निदर्शक. राजस्थानात काँग्रेसचे अनुभवी अशोक गेहलोत यांस भाजपच्या वसुंधरा राजे किती रसद पुरवतात; मुळात त्या याही वेळी तसे करणार का यावर गेहलोत आणि काँग्रेसचे त्या राज्यातील भवितव्य अवलंबून असेल. या दोघांच्या तुलनेत छत्तीसगडात बघेल बाबूंस भाजपचे तितके आव्हान नाही. दक्षिणेतील चंद्रशेखर राव हे तेलंगणचे अत्यंत आढ्यताखोर आणि स्वमग्न मुख्यमंत्री. मतपेटीद्वारे आलेली सत्ता आणि खासगी जहागिरी यांतील फरक अवगत आहे की नाही, असे त्यांचे वर्तन असते. त्यांना सत्ताच्युत करण्यात त्यामुळे भाजप आणि काँग्रेस या दोहोंसही रस आहे. या प्रयत्नात काठावर राहण्याची वेळ आल्यास भाजप या रावांस आपल्या पदराखाली घेईल, असे मानले जाते. त्या अर्थाने राज्याराज्यांत भाजपने जे आपले 'ब' संघ तयार केलेले आहेत त्यातील हे एक. त्यामुळेही हा भाजपचा 'ब' संघ सत्ता राखतो की काँग्रेस त्यास सत्ताच्युत करते हे या निवडणुकीतून दिसेल.

# प्रशासकराज: निवडणुकांची ढकल'चाल'

आधी करोनाचे निमित्त, मग प्रभाग पद्धतीत बदल, नंतर सत्ताबदल, पुन्हा प्रभाग पद्धतीत बदल, त्यातच ओबीसी आरक्षणाचा मुद्दा आणि या सर्वात सुरू असलेली न्यायालयीन लढाई.. गेल्या तीन-साडेतीन वर्षांपासून महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सातत्याने लांबणीवर पडत आहेत. प्रत्येक वेळी कारणे वेगवेगळी असली तरी निवडणुका लांबणीवर पडण्यामागे महाविकास आघाडी आणि महायुती सरकारची चालढकलच जबाबदार असल्याचे म्हटले जात आहे.







राज्यात सत्ताबदल झाल्यावर महानगरपालिका आणि नगरपालिकांमधील प्रभाग पद्धत बदलण्याची जणू परंपराच पडली आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने महानगरपालिका आणि नगरपालिकांमध्ये बहुसदस्यीय प्रभाग पद्धत तसेच नगराध्यक्षांची थेट निवडणूक घेण्यासाठी कायद्यात बदल केला होता. २०१९ मध्ये सत्ताबदल होताच उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील सरकारने पुन्हा एकसदस्यीय प्रभाग पद्धत लागू करण्याचा निर्णय घेतला. यानुसार २०२० मधील निवडणुका होणे अपेक्षित होते. पण करोनामुळे निवडणुका लांबणीवरच पडल्या.

दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमधील इतर मागासवर्गीयांचे (ओबीसी) राजकीय आरक्षणच रद्द केले. ते पुन्हा लागू व्हावे म्हणून सरकारची धावपळ सुरू झाली. या समाजाचे मागासलेपण सिद्ध करण्याचे आव्हान सरकारसमोर होते. सर्वोच्च न्यायालयाने निवडणुका घेण्याचा आदेश राज्य निवडणूक आयोगाला दिला होता. ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणुका झाल्यास त्याचा मोठा राजकीय फटका बसण्याची भीती होती. म्हणून त्या लांबणीवर टाकण्याच्या विविध क्लृप्त्या मविआ सरकारने केल्या.

सत्तेत येताच रद्द केलेली बहुसदस्यीय प्रभाग पद्धत मविआ सरकारने दीड-पावणेदोन वर्षांत पुन्हा लागू करण्याचा निर्णय घेतला. तसेच प्रभागांची रचना करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाऐवजी मध्य प्रदेशच्या धर्तीवर राज्य शासनाने स्वतःकडे घेतले. २०२१ची जनगणना झाली नसली तरी नागरी भागातील लोकसंख्या वाढल्याचा युक्तिवाद करून सर्व महानगरपालिका आणि नगरपालिकांमधील सदस्यसंख्या वाढविण्यात आली. परिणामी सर्व महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या सदस्यसंख्येत भर पडली. मुंबईत २२७ वरून प्रभागांची संख्या २३६ करण्यात आली. सर्वच महापालिकांमधील नगरसेवकांच्या संख्येत वाढ झाली. बहुसदस्यीय प्रभाग पद्धत लागू करणे आणि प्रभागांची रचना करण्याचे अधिकार स्वतःकडे घेण्याचा राज्य सरकारचा हा डाव निवडणुका लांबणीवर टाकण्याच्या प्रयत्नांचा भाग होता. दरम्यानच्या काळात सर्वोच्च न्यायालयाने निवडणुका घेण्याचा आदेश दिल्याने काही नगरपालिकांच्या निवडणुका ओबीसी आरक्षणाविना झाल्या.

ओबीसी आरक्षणाविना निवडणुका होऊ नयेत म्हणून सुरू असलेले मविआ सरकारचे प्रयत्न एकनाथ शिंदे यांच्या बंडामुळे सरकार कोसळल्याने बाजूला पडले. शिंदे-फडणवीस सरकारने मुंबई महानगरपालिकांमधील सदस्यसंख्या पुन्हा २३६ वरून २२७ केली. तसेच प्रभागांची पुन्हा जुन्या पद्धतीने रचना केली. नगराध्यक्षांची थेट निवडणूक तसेच बहुसदस्यीय प्रभाग रचनेच्या संख्याबळात बदल केले.

राज्यातील ९२ नगरपालिका आणि चार नगरपंचायतींच्या निवडणुकांचा कार्यक्रम जुलै २०२२ मध्ये राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केला. दरम्यानच्या काळात मध्य प्रदेशमधील ओबीसींचे राजकीय आरक्षण पुनस्र्थापित करण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला. लगेचच महाराष्ट्र सरकारने चपळाईने ओबीसींचे मागासलेपण सिद्ध करणारा अहवाल सादर केला. सर्वोच्च न्यायालयाने राज्यातही ओबीसींचे राजकीय आरक्षण पुन्हा लागू केले. परंतु तत्पूर्वी ९२ नगरपालिका आणि चार नगरपंचायतींच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला होता. तिथे ओबीसी आरक्षण लागू होणार नव्हते. या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. ओबीसी आरक्षणाची ही एक याचिका सर्वोच्च न्यायालयातच प्रलंबित आहे. मुंबई महानगरपालिकेची प्रभागसंख्या कमी करण्याची याचिकाही प्रलंबित आहे. अन्य महानगरपालिकांचीही याचिका प्रलंबित आहे.

आर्थिकदृष्ट्या कमकुवत बनलेल्या ठाणे महापालिकेला राज्य सरकारने दिलेला मदतीचा हात या स्थानिक स्वराज्य संस्थेची स्थिती सुधारण्यात उपयुक्त ठरला. राज्य सरकारकडून मिळालेल्या दीड हजार कोटींच्या अनुदानाच्या जोरावर पालिकेने गेल्या दीड वर्षांत अनेक महत्त्वाची कामे हाती घेतली आहेत. रस्ते नुतनीकरण कामे १० ते १५ टक्के शिल्लक आहेत. शाळा आणि शौचालय दुरुस्तीची कामे ३० टक्के झाली आहेत. तलाव सुशोभीकरण २० ते ३० टक्के कामे झाली आहेत. हे चित्र समाधानकारक असले तरी पालिकेवर असलेले दीड हजार कोटींचे दायित्व आव्हानात्मक आहे.प्रशासन आणि लोकप्रतिनिधी हे स्थानिक स्वराज्य संस्थेचे मुख्य स्तंभ. या दोन घटकांच्या कामगिरीवर या व्यवस्थेचा समतोल अवलंबून असतो. मात्र, गेल्या चार वर्षांत ही व्यवस्थाच नाहीशी झाली आहे.

# समान काम समान वेतनासाठी किती काळ लढा द्यायचा?



देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईतील बेस्ट सेवा हा एकेकाळी शहराच्या शिरपेचातील मानाचा तुरा होती. आजही इतर राज्यांत बससेवा सुरू करताना आधी 'बेस्ट' बससेवेचा अभ्यास केला जातो. अशा या सार्वजनिक वाहतुकीच्या महत्त्वपूर्ण साधनाचे खासगीकरण करण्याच्या डावात राज्य सरकार आणि खुद्द बेस्ट प्रशासनही सामील आहे. बेस्टला संपवण्याचा सरकारचा मानस आहे. त्याची सुरुवात त्यांनी बेस्टचा स्वतःचा ताफा कमी करून खासगी कंत्राटदारांना बसगाड्या चालविण्याची परवानगी देऊन केली आहे. हे कंत्राटदार स्वतःचा फायदा व्हावा यासाठी कामगारांची पिळवणूक करून नफा कमवत आहेत. बेस्टने नेहमीच मुंबईकरांना साथ दिली आहे. मुंबई पावसाच्या पाण्यामुळे तुंबली आणि शहराची जीवनवाहिनी असलेली रेल्वेसेवा बंद पडली, त्या प्रत्येक वेळी बेस्टने नेटाने सेवा दिली, हे कोणताही मुंबईकर विसरू शकत नाही. मुंबईतील नोकरदार महिलावर्ग बिनदिक्कत रात्रीचा व पहाटेचा प्रवास करू शकतो, तो या बेस्ट सेवेमुळेच! मुंबईत कामगारवर्ग मोठ्या प्रमाणात राहतो. या सर्वांना कामाच्या ठिकाणी पोहोचण्यासाठी या परवडणाऱ्या आणि शहराच्या कानाकोपऱ्यांत जाणाऱ्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची मोलाची मदत होते. मुंबईतील जनतेच्या रोजच्या जीवनाचा बेस्ट बस हा जिव्हाळ्याचा विषय आहे. त्यांच्या गरजेचा भाग आहे. बेस्ट बस प्रशासन त्याच गोष्टीचा फायदा घेऊन जनतेला वेठीस धरून ही सार्वजनिक वाहतूक सेवा खासगी करण्याच्या प्रयत्नात आहे. बेस्टचे खासगीकरण झाल्यास सामान्य जनतेकडून वसूल केलेला पैसा नफा म्हणून वापरणे शक्य होईल. आताही नफा कमविण्यासाठी हलक्या प्रतीच्या बस उपलब्ध करून दिल्या जात आहेत. कामगार व प्रवाशांच्या जीवाशी खेळ सुरू आहे. कामगारांच्या प्रशिक्षणावरचा खर्च कमी करून प्रवाशांचा व खुद्द त्या कामगारांचाही जीव धोक्यात घातला जात आहे. कमी पगारात हे कर्मचारी काम करत आहेत. कामाच्या ठिकाणी त्यांचा मानसिक छळ होतो. कामगार कायद्यातील कामगार या संज्ञेच्या व्याख्येत हे वेट लीज कामगार बसत नाहीत. त्यामुळे सगळे कामगार कायदे धाब्यावर बसवून कंत्राटदार पिळवणूक करतात. परिणामी हे कंत्राटी कामगार अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत जगत आहेत. तुटपुंज्या पगारामुळे हताश व कर्जबाजारी होऊन त्यापैकी काहींनी आत्महत्या केली. सर्वोच्च न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले आहे की कल्याणकारी राज्यात 'समान कामाला समान वेतन' नाकारणे हे शोषण आहे. या महत्वपूर्ण निरीक्षणाच्या सहाय्याने 'संघर्ष कर्मचारी कामगार युनियन' गेली दोन-तीन वर्षे कामगारांवरील अन्यायविरुद्ध आवाज उठवत आहे. आंदोलने करत आहे. वेट लीजचे सुमारे नऊ हजार कामगार या आंदोलनांत सहभागी होतात. ३१ जुलै रोजी वेट लिज कामगार रघुनाथ खजुरकर यांच्या कुटुंबाने व्यक्तिकरीत्या उपोषण सुरू केले. उपोषणाला वाढता पाठिंबा आणि सहभाग पाहून २ ऑगस्ट रोजी उपोषणकर्त्यांना मुख्यमंत्री भेट देणार आहेत, असे सांगितले गेले. इथे आंदोलनाला वेगळेच वळण दिले जात होते. मुखमंत्र्याबरोबर कोणतीही चर्चा होत नसताना, चर्चा होत आहे, असे भासवल जात होते. हा कामगारांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न होता. ३ ऑगस्ट रोजी संघर्ष कामगार कर्मचारी युनियनच्या कार्यकारीणीच्या बैठकीत निर्णय घेतला गेला की उपोषणाला पाठिंबा दर्शवून, ते पूर्ण बंद करून आपण आपल्या युनियनच्या बॅनरखाली आंदोलन करावे व आपले मागणी पत्र व निवेदन वडाळा बेस्ट डेपोमध्ये द्यावे. कामगारांना तसे आवाहन करण्यात आले आणि दुसऱ्याच दिवशी मागाठाणे, गोराई, मालवणी, दिंडोशी, मरोळ, ओशिवरा, सांताक्रूझ, धारावी, वरळी, मुंबई सेंट्रल, बॅकबे, प्रतीक्षा नगर, कुलाबा आणिक, देवनार, शिवाजी नगर, घाटकोपर, मुलुंड डेपोमधील वेट-लिज कर्मचाऱ्यांनी वडाळा बेस्ट डेपो येथे मोर्चा नेला. मागण्यांचे निवेदन मुख्यमंत्री व कामगार आयुक्त यांना देण्यात आले.

वसई विरार शहर महानगरपालिका
प्रभाग समिती "जी" वालीव
दुरध्वनी क्र. ९६६५००३८८७

ईमेल – phabhagsamitiwaliv@gmail.com
जावक क्र. वविशम/१७२३/२०२३-२४
दिनांक – १६/१०/२०२३

जाहिर नोटीस

वसई विरार शहर महानगरपालिका सर्व नागरीकांना सुचीत करण्यात येते की, खालील नमुद मिळकत धारकांनी मालमत्ता धारकांनी मालमत्ता हस्तांतरण कामी लेखी अर्ज तसेच कागदपत्रे सादर केली आहेत. फेरफार प्रकरणी कोणतीही हरकत / तक्रार असल्यास त्यांनी कार्यालयात जाहीर नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासुन सात (७) दिवसांच्या आत लेखी हरकत / तक्रार कागदपत्रांसह नोंदवावी. सदर हरकत/तक्रार न आल्यास कार्यालय पुढील मालमत्ता हस्तांतरणाची कार्यवाही करण्यात येईल.

| अ.क्र. (३८) | विभाग | मालमत्ता क्र. | ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणा-या किंवा करदात्याचे नाव | खरिददाराचे नाव किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | वालीव | व्ही.एल.०१/६७५२/२७२ | मोहम्मद अकबर फैजुला खान | अफजल मो. याकुब खान |
| २ | वालीव | व्ही.एल.१०/६३१९/८ | चंद्रकांत शांतीलाल सेठ व १ | निखील कन्हैयालाल मेहता व १ |
| ३ | वालीव | व्ही.एल.०३/५५३६ | गुलाब शालीग्राम पाटील | राणी सुनिल धारगुडे |
| ४ | वालीव | व्ही.एल.०१/६७५२/१६४ | राहील रफीक सिसोडीया | जुबेदा खातुन, समीउल्ला साहेबजाद खान |
| ५ | वालीव | व्ही.एल.०४/७१२१/१७ | एम एम इंटरप्रायजेस | आझाद ईदु खान |
| ६ | वालीव | व्ही.एल.०९/६९४६/२५ | आशिषा आशिष म्हात्रे | सुदेश राजाराम महाबळ, रेश्मा सुदेश महाबळ |
| ७ | वालीव | व्ही.एल.०३/६३३९/७ | सुमन दगडु बनसोडे | मंगला संदीप देवकर |
| ८ | वालीव | व्ही.एल.०३/५४५६/३२ | दिलीप नथुराम वळकुंदे | पुनिता रामप्रताप मिश्रा व १ |
| ९ | वालीव | व्ही.एल.०१/३९०८/१८ | राजेश मेहता | रामप्रताप आर मिश्रा व १ |
| १० | वालीव | व्ही.एल.०४/३५९४/२९ | शारदा शंकर खोत | रजनीकांत चंद्रशेखर कनोजीया |
| ११ | वालीव | व्ही.एल.१०/७०७६ | रफीकउद्दीन फतेउद्दीन शेख | राजेंद्र काशिराम जैस्वार |
| १२ | वालीव | व्ही.एल.१०/६१८० | रामुधुडा सोलंकी | धर्मेंद्र रामसपोर निशाद (विभक्त) |
| १३ | वालीव | व्ही.एल.०७/१६७३ | अन्नु तेजबहादुर सिंह व १ | निलम मन्नु सिंह |
| १४ | वालीव | व्ही.एल.०७/५५१४/२, ०७/५५१४/२/१ | कल्पना राजेन जाटकिया व १ | अनिल कुमार डी.सिंह व १ |
| १५ | वालीव | व्ही.एल.०६/७२७५/२९ | जिनल इन्फ्रा | म. डिटेक्शन टेक्नॉलॉजी प्रा.लि. तर्फे सिध्देश श्रीनिवास सावंत |
| १६ | वालीव | व्ही.एल.०३/७१२८/४९ | एम एम इंटरप्रायजेस | मोहम्मद कादिर बैतुल्लाह खान |
| १७ | वालीव | व्ही.एल.०४/६८१८/१ | दिपक मोटवानी | नसरुल्लाह उस्मान बधरा |
| १८ | वालीव | व्ही.एल.०४/६३२६/५ | अखिलेश राबरन वर्मा | उमेश नंदकुमार पांडये |
| १९ | वालीव | व्ही.एल.०३/१६७०/१ | सुमित्रा गुलाब गुप्ता | मनोज दादाजी पाथरे |
| २० | वालीव | व्ही.एल.१०/३१२५ | चंदनमल जुहरमल जैन | दिव्या मनोज ऐडवणकर |

सही /-
सहा. आयुक्त
प्रभाग समिती 'जी' वालीव
वसई विरार शहर महानगरपालीका

## मराठा आरक्षणाबाबतची क्युरेटिव्ह पिटीशन सर्वोच्च न्यायालयात दाखल

मुंबई : मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्यासाठी राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली क्युरेटिव्ह पिटीशन दाखल करून घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने होकार दिला आहे. राज्य शासनाने दाखल केलेल्या क्युरेटिव्ह याचिकेवर सुनावणी घेण्यास सरन्यायाधीश न्या. धनंजय चंद्रचूड यांनी होकार दिला आहे. त्यामुळे मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्याच्या राज्य सरकारच्या प्रयत्नांना बळ मिळाले आहे. काल राज्य सरकारचे सर्वोच्च न्यायालयातील वकील ज्येष्ठ विधिज्ञ मनिंदर सिंह यांनी ही क्युरेटिव्ह याचिका दाखल केली. त्यावर सुनावणी करण्याची विनंती सर्वोच्च न्यायालयाकडे केली. त्यावर 'आम्ही ही याचिका दाखल करून त्यावर सुनावणी घ्यायला तयार आहोत' असे सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्या. धनंजय चंद्रचूड यांनी सांगितले.



## वन नेशन-वन स्टुडंट आयडी; विद्यार्थ्यांसाठी आता 'आधार'सारखे कार्ड

नवी दिल्ली : 'वन नेशन, वन स्टुडंट आयडी' तयार करण्याची योजना केंद्र सरकारने आखली आहे. त्याला ऑटोमेटेड पर्मनंट अॅकॅडमिक अकाऊंट रजिस्ट्री (APAAR) म्हणतात. देशभरातील शालेय विद्यार्थ्यांसाठी आता लवकरच 'एक देश, एक ओळखपत्र' असं आधार कार्डसारखेच दस्तावेज आणण्याची तयारी केंद्र सरकारने सुरू केली असून आधार कार्डप्रमाणेच विद्यार्थ्यांसाठी एक युनिक कोड दिला जाणार आहे. यासाठी पालकांची संमती घेण्यात येणार आहे. ही योजना म्हणजे २०२० मध्ये आणल्या गेलेल्या नवीन शैक्षणिक धोरणाचा हा एक भाग आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने प्राथमिक ते उच्च शिक्षणापर्यंतच्या प्रत्येक विद्यार्थ्यासाठी 'वन नेशन, वन स्टुडंट आयडी' तयार करण्याची योजना आखली आहे.



## दिल्ली पुन्हा भूकंपाने हादरली; नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण

नवी दिल्ली : दिल्ली एनसीआर पुन्हा भूकंपाच्या धक्क्याने हादरली असून लोकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या दोन आठवड्यात दुसऱ्यांदा हा भूकंपाचा धक्का बसला आहे. दिल्ली, गाझियाबाद आणि नोएडा परिसरात आज भूकंपाचे धक्के जाणवले. हे भूकंपाचे धक्के इतके मोठे होते की लोक घाबरले आणि घराबाहेर पळाले. दिल्लीत झालेल्या या भूकंपाची तीव्रता ३.१ रिश्टर स्केल इतकी नोंदली गेली. या भूकंपाचा केंद्रबिंदू हरियाणातील फरीदाबादमध्ये असल्याची माहिती आहे. रविवारी दुपारी ४ वाजून ८ मिनिटांनी दिल्ली-एनसीआरमध्ये भूकंपाचे धक्के जाणवले. सध्यातरी या भूकंपात कोणतीही हानी झाली नसल्याची माहिती आहे.

## मिरा-भाईंदरमधील ४७ रस्ते होणार चकाचक; रस्त्यांच्या सुधारीकरण आणि काँक्रीटीकरणाचा एमएमआरडीएचा निर्णय




मुंबई मिरा-भाईंदरमधील ४७ रस्त्यांचे सुधारीकरण आणि काँक्रीटीकरण करण्याचा निर्णय मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) घेतला आहे. चार टप्प्यांमध्ये ही कामे केली जाणार असून या कामासाठी चार कंत्राटदारांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. हे रस्ते राष्ट्रीय महामार्ग ८ आणि मुख्य रस्त्यांशी जोडलेले असून या रस्त्यांचे सुधारीकरण झाल्यास वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटणार असून प्रवास वेगवान होणार आहे. मिरा-भाईंदर शहराच्या हद्दीत डांबरी रस्ते असून यातील बर्याच रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. तर वाहतूक कोंडीचा प्रश्नही निर्माण झाला आहे. ही बाब लक्षात घेतला एमएमआरडीएने मिरा-भाईंदरमधील ४७ रस्त्यांच्या सुधारीकरणाचा तसेच काँक्रीटीकरणाचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार २१.८० किमीच्या ४७ रस्त्यांचे काँक्रीटीकरण करत रस्त्यांचे सुधारीकरण केले जाणार आहे. सध्या या ४७ रस्त्यांची ६ ते ४५ मीटर अशी आहे. एमएमआरडीएच्या प्रस्तावानुसार रस्त्यांचे कॉंकीटीकरण करत रस्त्यांच्या दोन्ही बाजूला पर्जन्यजलवाहिन्यांसह रस्त्यांची कामे केली जातील. तर रस्त्यांच्या दोन्ही बाजूस पदचारी पथही असणार आहे. रस्ते सुधारीकरण आणि काँक्रीटीकरण प्रकल्पासाठी चार टप्प्यात एमएमआरडीएने निविदा मागविल्या होत्या. त्यानुसार सप्टेंबरमध्ये झालेल्या प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या बैठकीत निविदा अंतिम करण्यात आल्या आहेत. पहिल्या टप्प्याचे काम एन. ए. कन्स्ट्रकशन प्रायव्हेट लिमिटेडला, दुसर्या टप्प्याचे काम मे. गजानन कन्स्ट्रकशनला, तिसर्या टप्प्याचे काम मे. बिटकॉन इंडिया इन्फ्रास्टक्चर डेव्हलपर्सला तर चौथ्या टप्प्याचे काम मे. आर.ई. इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेडला देण्यात आले आहे. निविदा अंतिम झाल्याने आता लवकरच रस्त्यांच्या कामाला सुरुवात होण्याची शक्यता आहे. तर ही कामे झाल्यास मिरा-भाईंदरमधील वाहतूक कोंडी सुटण्याच मदत होणार असून प्रवास सुकर होणार असल्याचा दावा एमएमआरडीएने केला आहे.

## मुंबईः वेब मालिका पाहून फसवणूकीची युक्ती सूचली; गरब्याच्या बनावट प्रवेशिका बनवून फसवणूक; १२ तासांत आरोपीला अटक



मुंबईः नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने खासगी गरब्याच्या बनावट प्रवेशिकांची विक्री करून आयोजकांची फसवणूक करणाऱ्या चौघांना १२ तासात अटक करण्यात आली असून त्यांच्या दोन पसार साथीदारांचा शोध सुरू आहे. वेब मालिका पाहून ही युक्ती सुचल्याचे मुख्य आरोपीने चौकशीत सांगितले आहे. दुर्गादेवी नवरात्र उत्सव समिती बोरिवली आणि स्थानिक आमदार प्रस्तुत रंगरात्री दांडिया नाईट्स सीझन २ विथ कींजल दवे या कार्यक्रमाचे आयोजन १५ ऑक्टोबर पासून करण्यात आले. त्याच्या प्रवेशिकांची विक्री बोरिवलीतील कच्छी मैदान या ठिकाणावर असलेल्या एकाच स्टॉल वरून तसेच ऑनलाईन संकेतस्थळाद्वारे करण्यात येत आहे. मात्र काही तरुणांनी त्यांना मिळालेल्या प्रवेशिका बनावट असल्याची तक्रार आयोजक नीरव मेहता (३२) यांच्याकडे १४ ऑक्टोबर रोजी केली. महाविद्यालयातील मित्र करण शहा याने दर्शन गोहिल नावाच्या व्यक्तीकडून घेऊन प्रत्येकी ३ हजार रुपये याप्रमाणे १० प्रवेशिका विकल्याचे उघड झाले. त्यानुसार एमएचबी कॉलनी पोलिसांत आयोजकांनी धाव घेतली. गुन्हा नोंद होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुधीर कुडाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने शाह (२९), दर्शन गोहिल (२४), परेश नेवरेकर (३५) तसेच कवीश पाटील (२४) यांना अटक केली. विरार, कांदिवली, मालाड मधून मोबाईल लोकेशनच्या मदतीने त्यांना पोलिसांनी शोधून काढले. आरोपीकडून पोलिसांनी ३० लाख रुपयांच्या बनावट प्रवेशिका, होलोग्राम स्टिकर, लॅपटॉप, प्रिंटर व इतर साधन सामुग्री मिळून ३५ लाखांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या गुन्ह्यातील मुख्य आरोपी करण शहा हा ग्राफिक डिझायनर असून त्याने एका वेब मालिकेतील प्रसंगांवरून हा गुन्हा केल्याचे चौकशीत उघड झाले आहे.


## भांडुपमध्ये तरूणाकडून प्रेयसीवर चालत्या रिक्षात चाकूने वार



मुंबई : प्रेमसबंध ठेवण्यास प्रेयसीने नकार दिल्याने संतापलेल्या तरूणाने त्याच्या प्रेयसीवर चालत्या रिक्षात चाकूने वार केल्याची घटना भांडुप येथे घडली. याबाबत भांडुप पोलिसांनी तरुणाविरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. चेतन गायकवाड (वय २७) असे या आरोपी तरुणाचे नाव असून तो भांडुपच्या टेंभीपाडा परिसरातील राहणारा आहे. याच परिसरात राहणाऱ्या एका २१ वर्षीय तरुणाशी त्याचे अनेक वर्षांपासून प्रेमसंबंध आहेत. मात्र प्रेयसीने काही दिवसांपूर्वी अचानक त्याच्यापासून लांब राहण्याचा निर्णय घेतला. संतापलेल्या चेतनने तिला १२ ऑक्टोबरला एका कॅफेमध्ये भेटण्यासाठी बोलावले होते. तेथे दोघांमध्ये वाद झाल्याने तरुणी तिच्या घरी निघून गेली. त्यानंतर १४ ऑक्टोबरला पुन्हा त्याने तिला भेटण्यासाठी बोलावले. त्यानंतर दोघेही अंधेरी परिसरात गेले होते.

## डोक्यात लोखंडी सळी मारून २४ वर्षीय तरूणाची हत्या; आरोपीला अटक

मुंबईः मालाड पोलिसांच्या हद्दीत दुधाचे ट्रे उतरवण्याच्यावरून झालेल्या वादातून २४ वर्षीय तरूणाच्या डोक्यात लोखंडी सळी मारून हत्या करण्यात आली. याप्रकरणी मालाड पोलिसांनी रविवारी गुन्हा दाखल करून दिनेश रामदेव यादव (३९) याला अटक केली. आरोपीने गुन्ह्यांत वापरलेली लोखंडी सळी पोलिसांनी हस्तगत केली आहे. बासरी हिल परिसरातील दुध केंद्रावर हा घडला. विक्रमकुमार रमेशचंद्र यादव(२४) असे मृत तरूणाचे नाव असून तो कांदिवली पश्चिम येथील चारकोप परिसरातील रहिवासी आहे. याबाबत पोलिसांनी दिलेल्या



माहितीनुसार, रविवारी दुध केंद्रावर दूध उतरवण्यावरून झालेल्या वादातून दिनेश यादव याने दुधाचे ट्रे खेचण्यासाठी वापरण्यात येणारी लोखंडी सळी विक्रमकुमारच्या डोक्यावर मारली. त्यात विक्रमकुमारच्या डोक्याला डाव्या बाजूला जोरदार फटका बसल्यामुळे तो खाली कोसळला. त्याला बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा केअर सेंटर येथील रुग्णालयात नेण्यात आले. तेथील डॉक्टरांनी विक्रमकुमारला मृत घोषित केले. याप्रकरणी विक्रमकुमारचा भाऊ समरबहादूर यादव (२३) याच्या तक्रारीवरून मालाड पोलिसांनी याप्रकरणी हत्येचा गुन्हा दाखल केला. त्यानंतर आरोपी दिनेश यादव याला अटक करण्यात आली.

# अन्न भेसळीप्रमाणे यांच्या हिंदुत्वात मिलावट

### मुख्यमंत्री शिंदे यांची उबाठा सेनाप्रमुखांवर टीका



'ज्याप्रमाणे अन्नात भेसळ होते, त्याप्रमाणे हिंदुत्वात मिलावट करण्याचा प्रयत्न होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केल्याशिवाय यांचा दिवस गोड जात नाही. हिंदुत्वाला तिलांजली देऊन त्यांनी काँग्रेस पक्षाला मांडीवर घेतले. तेव्हाच त्यांचे बेगडी हिंदुत्व लोकांना समजले. त्यांचा हा मुखवटा आगामी लोकसभा निवडणुकीत जनता दूर केल्याशिवाय राहणार नाही', अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. येत्या निवडणुकीत जनता त्यांना त्यांची जागा दाखवल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

उबाठा सेनेने समाजवादी पक्षासोबत घेतलेल्या बैठकीबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्रकारांनी विचारले, त्यांनी उद्धव यांच्यावर सडकून टीका केली. 'ज्याप्रमाणे अन्नात भेसळ होते, त्याप्रमाणे हिंदुत्वात मिलावट करण्याचा प्रयत्न केला जातोय. ज्या काँग्रेसला गाडण्याची भाषा बाळासाहेब ठाकरे यांनी केली. त्यांना मांडीवर घेणाऱ्यांना जनता कधीच माफ करणार नाही', असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. बाळासाहेब ठाकरे यांना अभिप्रेत असलेले हिंदुत्व ज्यांनी सोडले, सत्तेच्या लालसेसाठी हिंदुत्वाच्या विचाराला जनतेने मतदान करूनही यांनी मतदारांचा विश्वसघात केला आणि असंगाशी संग केला, त्यांना आता जनताच जागा दाखवेल, असेही ते म्हणाले. घरी बसून काम करणाऱ्यांना नागरिक मत देत नाहीत. त्यामुळे या सर्वांनी एकत्र येऊन कितीही प्रयत्न केले, तरीही २०२४ मध्ये लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पुन्हा बहुमताने निवडून येतील, ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे, असेही ते म्हणाले.

'पंतप्रधान मोदी यांच्यावर टीका केल्याशिवाय यांचा दिवस गोड जात नाही. हिंदुत्वाला तिलांजली देऊन त्यांनी काँग्रेस पक्षाला मांडीवर घेतले. तेव्हाच त्यांचे बेगडी हिंदुत्व लोकांना समजले. त्यांचा हा मुखवटा आगामी लोकसभा निवडणुकीत जनता दूर केल्याशिवाय राहणार नाही', असे ते म्हणाले.

दरम्यान, ठाणे येथील टेंभीनाका परिसरात शिवसेनेचे दिवंगत नेते आनंद दिघे यांनी जय अंबे माँ सार्वजनिक धर्मादाय विश्वस्त संस्थेच्या माध्यमातून नवरात्रोत्सव सुरू केला होता. आनंद दिघे यांच्या निधनानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने टेंभीनाका नवरात्रोत्सव आयोजित केला जातो. रविवारी येथील देवीची आगमन मिरवणूक निघाली होती. या मिरवणुकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शिंदे गटाचे आणि ठाकरे गटाचे पदाधिकारी सहभागी झाले होते. या मिरवणुकीमुळे कोर्टनाका, कळवा, विटावा, ठाणे रेल्वे स्थानक, जांभळीनाका बाजारपेठ परिसरात वाहतूक कोंडी झाली होती.

## इस्त्रायलमधून भारतीयांची चौथी तुकडी दिल्लीत दाखल



इस्त्रायलमध्ये अडकलेल्या भारतीयांच्या सुटकेसाठी भारताने हाती घेतलेल्या 'अजय' मोहिमेंतर्गत भारतीयांची चौथी तुकडी दिल्लीत दाखल झाली असून यामध्ये २५० हून अधिक भारतीय सुखरूप मायदेशी परतले आहेत.

या पहिल्या तुकडीमध्ये महिला, वृद्ध आणि लहान मुलांसह एकूण २७४ जणांचा समावेश असून हे सर्वजण भारतात सुखरूप पोहोचले आहेत. इस्रायल-हमास यांच्यात सध्या सुरू असलेल्या युद्धादरम्यान भारताच्या ऑपरेशन अजय अंतर्गत इस्रायलमध्ये अडकलेल्या भारतीय नागरिकांना घेऊन येणारे चौथे विमान रविवारी सकाळी नवी दिल्ली विमानतळावर दाखल झाले. इस्रायलहून भारतात परतणाऱ्या प्रवाशांची निवड 'प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' या तत्त्वावर करण्यात आली. भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी रविवारी सकाळी ट्विटरवरून माहिती देत याबाबतचे फोटोही शेअर केले आहेत. आतापर्यंत ५०० हून अधिक भारतीय सुखरूप

### २७४ भारतीय सुखरूप मायदेशी

परतले आहेत. इस्रायल-हमास युद्धात आतापर्यंत ४५०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला असून १२ हजार हून अधिक जण जखमी झाले आहेत. याआधी इस्रायलहून भारतीयांच्या तीन तुकड्या भारतात पोहोचल्या. पहिल्या तुकडीत २१२ भारतीय, दुसऱ्या तुकडीत २३५ आणि आता तिसऱ्या तुकडीत १९७ भारतीय सुखरूप मायदेशी परतले आहेत. इस्त्राइल व हमास दरम्यान सुरू असलेले युद्ध थांबवण्यासाठी जगभरातील अनेक देश मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करत आहेत.

## धारावी डायलिसिस सेंटरचे मॉडेल इतर रुग्णालयांसाठी आदर्श ठरेल

दीपक केसरकर यांचे प्रतिपादन

नागरी वस्ती वाढताना अधिकाधिक नागरी सुविधा पुरविणे ही सरकारची जबाबदारी आहे. प्रत्येक रुग्णालयाच्या भागात डायलिसिस सेंटरची सुविधा त्याच ठिकाणी उपलब्ध करून देणे, हे सरकारचे उद्दिष्ट आहे. धारावीसारख्या घनदाट लोकसंख्येच्या भागात नागरिकांचे आयुष्यमान उंचावताना त्यांना सर्वोत्कृष्ट नागरी सुविधा देण्याचा प्रयत्न आहे. त्यांचे जीवन सुसह्य करण्याच्या दृष्टीने डायलिसिस सुविधा धारावीकरांच्या मागणीनुसार उपलब्ध करून देत आहोत, असे प्रतिपादन शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी येथे केले. धारावीतील डायलिसिस सेंटरचे मॉडेल हे इतर रुग्णालयांसाठी आदर्श ठरावे, असा आशावादही त्यांनी व्यक्त केला.

धारावीमध्ये लोकनेते एकनाथ गायकवाड नागरी आरोग्य केंद्र येथील डायलिसिस केंद्राचे लोकार्पण आज झाले, त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी खासदार राहुल शेवाळे, आमदार कॅप्टन तमिल सेल्वन उपस्थित होते.

लोकमान्य टिळक रुग्णालयच्या नेफ्रोलॉजी विभागाच्या माध्यमातून डायलिसिस उपचाराची विस्तारित स्वरूपाची सुविधा यानिमित्ताने रूग्णांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. याठिकाणी १२ डायलिसिस मशीन आणि एक आरओ प्लांटची सामाजिक सहभागातून मोफत स्वरूपाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सायन रुग्णालयातून शिफारस झालेल्या नियमित डायलिसिस उपचार घेणाऱ्या स्थिर रुग्णांसाठी ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. १२ पैकी ९ मशीन नियमित रूग्णांसाठी तर ३ मशीन्स या व्याधींनी ग्रस्त रूग्णांसाठी असतील. खासदार राहुल शेवाळे म्हणाले की, धारावीतील नागरिकांची अनेक दिवसांपासून डायलिसिस सेंटर सुरू करण्याबाबत मागणी होती. नगरसेवकांनीही पालिका प्रशासनाकडे पाठपुरावा केला होता. आज नवरात्रीच्या पहिल्याच दिवशी नागरिकांना ही सुविधा उपलब्ध झाली आहे, असे ते म्हणाले.

अति पालिका आयुक्त डॉ. सुधाकर शिंदे म्हणाले की, एखाद्या खासगी रुग्णालयात देण्यात येणाऱ्या सुविधेइतकीच उत्तम वैद्यकीय सुविधा धारावी रुग्णालयात उपलब्ध करून देण्यात आली आहे. पालकमंत्री दीपक केसरकर यांच्या पाठपुराव्यामुळे धारावीचे मॉडेल हे इतर रुग्णालयासाठी आदर्श ठरणार आहे.

## कॉर्पोरेट क्षेत्रातील कर्मचारी मानसिक आजारांच्या विळख्यात

### मानसिक आरोग्य संदर्भात केलेल्या सर्वेक्षणात माहिती उघडकीस

रिअल इस्टेट सेक्टरमधील ग्राहकांची गरज तसेच विचार बदलल्यामुळे यासोबतच नोकरीमधील ताणामुळे नोकरी देणाऱ्यांनी कर्मचाऱ्यांच्या कल्याणावर अधिक लक्ष देण्याची गरज आहे. जवळजवळ ४८ टक्के कॉर्पोरेट क्षेत्रातील कर्मचारी मानसिक आरोग्याच्या समस्यांशी झुंजत आहेत. यातही स्त्रियांचे प्रमाण जास्त आहे. ४१ टक्के पुरुष हे या ताणाला तोंड देतात तर स्त्रियांचे प्रमाण ५६ टक्के एवढे आहे.

एम पॉवर, या आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टच्या पुढाकाराने करण्यात आलेल्या 'मानसिक आरोग्य आणि वेलनेस कोटिएंट @वर्कप्लेस २०२३' या नवीन सर्वेक्षणातून ही आकडेवारी समोर आली आहे.

रिअल इस्टेट डेव्हलपर असलेला अश्विन शेठ ग्रुप 'जागतिक मानसिक आरोग्य दिन २०२३ 'ची जागतिक थीम लक्षात घेऊन कंपनीमध्ये मानसिक आरोग्य जागरूकता वाढविण्यासाठी तसेच मानसिक आरोग्यास प्रोत्साहन देण्यासाठी सक्रीय पुढाकार घेत आहे. बॉम्बे पेंटिंग क्लबतर्फे 'डिस्कव्हर युवर इनर पीस'वर डॉ. कल्याणी कांबळे यांची कार्यशाळा घेण्यात आली होती.

कर्मचाऱ्यांच्या मानसिक आरोग्याविषयीच्या वाढत्या चिंतेबद्दल बोलताना, अश्विन शेठ ग्रुपचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक अश्विन शेठ म्हणाले, "अश्विन शेठ ग्रुप एक सहाय्यक आणि सर्वसमावेशक कार्यस्थळ तयार करण्यासाठी वचनबद्ध आहे. या ठिकाणी कर्मचाऱ्यांच्या मानसिक आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य दिले जाते. मूलभूत मानवी हक्क म्हणून मानसिक आरोग्याचे महत्त्व आहे. हे आम्ही ओळखतो आणि ते आमच्या कर्मचाऱ्यांना मिळेल याची खात्री करणे ही एक संस्था म्हणून आमची जबाबदारी आहे.

डॉ. कल्याणी कांबळे, व्हिजनरिंग लाईफच्या संस्थापक आणि व्यवसाय प्रशिक्षक आणि प्रिसेंट स्ट्रॅटेजिस्टच्या सह-संस्थापक म्हणाल्या की, भारतातील सर्व कॉर्पोरेट कर्मचाऱ्यांपैकी जवळपास निम्मे कर्मचारी त्यांच्या मानसिक आरोग्याबाबत झगडत आहेत आणि मानसिक आरोग्य तसेच व्यावसायिक आणि व्यक्तिगत जीवनातील संतुलनाबद्दल जागरूकता पसरवणे महत्त्वाचे आहे.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत).संपर्कः-9594418181 / 8424989898